# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पिंपरी-चिंचवड **P.S.(ठाणे):** हिंजवडी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0260 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/05/2025 14:27

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 15/04/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 16/04/2025
**Time From (वेळेपासून):** 16:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 02:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 14/05/2025 **Time (वेळ):** 14:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 022
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/05/2025 14:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** हिंजवडी पोलीस स्टेशन,पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

वरिष्ठ पोलीस निरीक्षक हिंजवडी पोलीस स्टेशन पिं. चिं. शहर.



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्रीमती उज्वला विक्रम साळुंके

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1995

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लक्ष्मी चौक मारुंजी, श्रीकुंज,सोसायटी, हिंजवडी फेज 1 पुणे,हिंजवडी, पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लक्ष्मी चौक मारुंजी, श्रीकुंज,सोसायटी, हिंजवडी फेज 1 पुणे,हिंजवडी, पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8446184841

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दत्तात्रय नामदेव काळे | | | 1. पोलीस उप निरीक्षक, वर्ग -2,, हिंजवडी पोलीस स्टेशन ,पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे,हिंजवडी,पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद तारीख- 14/05/2025

मी. श्रीमती उज्वला विक्रम साळुंके, वय -30 वर्षे, व्यवसाय – गृहीणी, रा.लक्ष्मी चौक मारुंजी, श्रीकुंज सोसायटी, हिंजवडी फेज 1 पुणे.मोबा.क्र. 8446184841.

समक्ष हजर राहुन जबाब देते की, माझे पती व्रिकम राजेंद्र साळुंके यांच्यावर हिंजवडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे. माझे पती हे सध्या येरवडा कारागृहात आहेत. दिनांक 12/04/2025 रोजी मी माझे पती हे हिंजवडी पोलीस स्टेशन येथे पोलीसांच्या ताब्यात असताना मी त्यांना जेवणाचा डब्बा व कपडे घेऊन गेली असताना माझ्या पतीविरोधात दाखल गुन्हयाचे तपासी अधिकारी असणारे पीएसआय काळे हे मला पोलीस स्टेशन येथे भेटले त्यावेळी त्यांनी माझ्या पतीला जामिनावर सोडविण्यासाठी कार्टात हजर राहुन से देण्याकरीता माझ्याकडे 60,000/- रुपयांची मागणी केली. तसेच दि.14/04/2025 रोजी सकाळी 11/08 वाजण्याच्या सुमारास माझ्या मोबाईल नंबरवर मो.क्र. 9730777758 यावरुन व्हॉट्सअप कॉल येत आहेत व समोरील व्यक्ती मला दत्ता काळे हे माझे सिनीअर असल्याबाबत सांगत आहेत. व मी लक्ष्मी चौकात थांबलो आहे.तुम्ही पैसे घेऊन या असे सांगत आहेत. जर पैसे घेऊन आले नाहीत तर साहेब कोर्टात थांबणार नाहीत असे त्यांनी मला सागितले. सदरची बाब मी माझा भाऊ जगदीश पवार यांना सांगितली. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, सदरची रक्कम ही लाच मागणी आहे. पीएसआय काळे यांनी मागितलेली रक्कम हि लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली आहे. त्यामुळे मला माझा भाऊ जगदिश पवार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,येथे घेऊन आले.तसेच पीएसआय काळे यांच्यात व माझ्यात यापुर्वी कोणतीही आर्थीक व्यवहार नसुन आमचेत कोणतेही वैमनस्य नाही. तरी आपले विभागामार्फत त्यांच्यावर योग्य ती कारवाई व्हावी हि विनंती. ." अशी तक्रार मी दि.15/04/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे पोलीस उप अधिक्षक, श्री.गावडे यांना दिली होती. त्यांनी त्यांचे दालनात पोलीस निरीक्षक श्री प्रेम वाघमोरे, लाप्रवि पुणे यांना बोलावुन सदर तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कायदेशिर कारवाई करणेबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार नगर भुमापण अधिकारी क्र.1 पुणे यांचेकडील श्रीमती दिपाली महेंद्र मंडलिक, वय 44 वर्षे, व्यवसाय-नोकरी- पद – परिरक्षण भूमापक क्र.5, नगर भूमापन अधिकारी क्र.1 पुणे, पत्ता- कुबेरा रिध्दीत अपार्टमेंट, स्वामी समर्थ मंदीरा शेजारी हडपसर पुणे व श्री. सागर राम बहीरमल, वय 38 वर्षे, व्यवसाय-नोकरी- पद – परिरक्षण भूमापक क्र.5, नगर भूमापन अधिकारी क्र.1 पुणे, पत्ता- फलॅट नं. 14, सी.टी.एस. 820, बालाजीस्नेह अपार्टमेंट, गुरुवार पेठ पुणे असे दोन पंच दि.15/04/2025 रोजी 16.00 वा उपलब्ध झालेनंतर मी माझी लेखी तक्रार पचासमक्ष वाचुन दाखवली सदर ची तक्रार माझे हकिकती प्रमाणे बरोबर असल्याची खात्री करुन माझे लेखी तक्रारीवर पोलीस निरीक्षक श्री प्रेम वाघमोरे यांनी व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या.

त्यानुसार दि.15/04/2025 रोजी पीएसआय श्री दत्ता काळे नेमणुक हिंजवडी पोलीस स्टेशन यांची माझेकडे लाचेची मागणी आहे अगर कसे याबाबत पडताळणी हिंजवडी पोलीस स्टेशनचे पाठीमागील बाजुचे परसिटंट कंपनी लेन, बॅकसाईट आयआयटी पार्क रोड येथुन करणेचे ठरले त्यानुसार मी, सापळा अधिकारी श्री. वाघमोरे, व त्यांचे पथक, दोन पंच असे शासकीय वाहनातुन हिंजवडी पोलीस स्टेशनचे पाठीमागील बाजुचे परसिटंट कंपनी लेन, बॅकसाईट आयआयटी पार्क रोड येथे गेलो तेथे पोहोचल्यावरसापळा अधिकारी श्री. वाघमोरे यांनी सॅनडीस्क कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड त्यांचे वेस्टनातुन बाहेर काढुन पंचासमक्ष शासकिय व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकले. त्यानंतर

वरिष्ठ पोलीस निरीक्षक

माझे व पंच क्र.1 श्रीमती दिपाली मंडलिक यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ 17.44 वा.ची होती. त्यानंतर पी.एस.आय. दत्ता काळे यांचेकडे पडताळणीकामी पाठविणेकामी शासकिय व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन ते म.पो.हवा. वेताळ यांचे मार्फतीने सेफटी पिन च्या सहाय्याने माझ्या ब्लाऊजचे आतील बाजूस दिसणार नाही असे लावले. त्यानंतर मला शासकिय पंच क्र.1 श्रीमती दिपाली मंडलिक यांचेसह हिंजवडी पोलीस स्टेशन येथे 17.52 वा. पाठवले त्यावेळी पी.एस.आय.काळे हे पोलीस स्टेशन येथे हजर नव्हते त्यामुळे मी त्या ठिकाणी असणा-या पोलीसांकडुन पीएसआय श्री दत्ता काळे यांना फोन लावण्याबाबत विनंती केली. त्यावेळी तेथील पोलीसांनी पीएसआय श्री दत्ता काळे यांना त्यांच्या मोबाईलवरून फोन लावला तेव्हा माझे त्यांचेशी फोनवर बोलणे झाले तेव्हा पी.एस.आय. श्री दत्ता काळे म्हणाले माझी आज नाईट डयुटी आहे मी संध्याकाळी 09/00 वाजता पोलीस स्टेशन येथे येणार आहे. तुम्हाला भेटायच असेल तर संध्याकाळी नऊ ते सव्वानऊ वाजता येऊन भेटा असे फोनवर सांगितले. त्यामुळे मी व पंच परत माघारी शासकीय वाहन थांबले ठिकाणी आलो त्यावेळी म.पो.हवा सरीता वेताळ यांनी माझ्याकडील रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 18/06 वा.ची होती. त्यावेळी पीएसआय श्री दत्ता काळे यांची नाईट डयुटी असल्याने व त्यांनी संध्याकाळी नऊ वाजता मला भेटण्याकरीता बोलविले असल्याने पुढील पडताळणी कारवाई ही संध्याकाळी नऊ वाजता पीएसआय श्री दत्ता काळे यांना भेटुन करण्याचे ठरले.

पीएसआय श्री दत्ता काळे यांनी मला संध्याकाळी भेटण्याकरीता बोलविले असल्याने त्याप्रमाणे मला पीएसआय दत्ता काळे यांचेकडे पडताळणीकामी पाठविणेकामी शासकिय व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन ते सेफटी पिन च्या सहायाने म.पो.हवा.वेताळ यांनी ब्लाऊजचे आतील बाजुस लावुन देऊन शासकिय पंच क्र.1 श्रीमती दिपाली मंडलिक यांचेसह हिंजवडी पोलीस स्टेशन येथे 21.37 वा.पाठवले त्यावेळी मी पंच क्र.1 यांचेसह हिंजवडी पोलीस स्टेशन येथे गेलो त्यावेळी मी पंचासह पी.एस.आय. दत्ता काळे यांची भेट घेतली असता मी त्यांना म्हणाले"तुमचे एक माणसाचा फोन येतोय मला, तुमचे नाव सांगतो.. असे सांगितले तेव्हा त्यांनी मीच सांगितलं.. आहे.असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना ते 60 हजार रुपये सांगतात सर,, खुप होतात सर, एवढे नाही होत माझ्यानी.. तेव्हढं..लय व्हायला लागलय.., तेव्हढ नाही होत माझ्यानी..असे म्हणाले, त्यावेळी पी.एस.आय.काळे मला म्हणाले की,सांगा आता तुमचे मनाने... तेव्हा मी त्यांना मी 30 एक हजार देऊ शकते सर..असे म्हणाले.मी अकरा वाजता आले होते चौकीत सर मी डब्बा दयायला आले होते, तुम्ही नव्हते इथ..असेही म्हणाले त्यावेळी ते म्हणाले काय करता मग सांगा..तेव्हा मी त्यांना तिसच हजार जमा आहेत माझेकडे असे सांगितले. त्यावर ते ठिक आहे.. पन्नास हजार .. पन्नास दिले तरी बास..असे म्हणाले,तेव्हा मी आ..पन्नास हजार सर..नाही..ते मी बहिणीचे मंगळसुत्र गहाण ठेवुन घेतले..माझेपण गळयात नकली मंगळसुत्र आहे... नाहीतर माझेपण ठेवले असते.असे म्हणाले. तेव्हा त्यांनी विचारले आत्ता आहेत का लगेच ..त्यावर मी त्यानाआणावे लागेल मला शिवाजी चौकात जाऊन एक 15 मिनीट देता का...मला मी घेऊन येते. असे म्हणाले. त्यावर मी त्यांना पैसे घेवुन कुठे यायचे याबाबत विचारले तेव्हा ते पोलीस स्टेशनच्या मागे.. पोलीस स्टेशनच्या मागे..असे म्हणाले, तेव्हा मी त्यांना आधी जाऊन येऊ का मी.. असे विचारले त्यावर ते हा.. ठिक आहे चालेल.. असे म्हणाले, तेव्हा मी म्हणाले सर पण तिसच होईल.. तिसच होईल..असे त्यांना म्हणाले त्यावर ते ठिक आहे.. मग ..काय करता आता, नाईलाज आहे. असे मला म्हणाले." त्यावेळी पीएसआय दत्ता काळे यांनी माझेकडे कोर्टमध्ये कागदपत्रे जमा करण्याकरीता व माझ्या पतीला येरवडा कारागृहातुन सोडविण्यासाठी सुरवातीला 60,000/- रुपयाची मागणी करुन तडजोडीअंती 30,000/- रुपयाची मागणी केली व सदरचे पैसे थोडया वेळात हिंजवडी पोलीस स्टेशन चे पाठीमागे घेवुन बोलाविल्यामुळे मी पंचांसह सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी रात्रौ 22.22 वा परत आले. त्यामुळे पडताळणी कारवाईस उशीर झाल्याने व लोकसेवक दत्ता काळे यांनी पोलीस स्टेशन चे पाठीमागे पैसे घेऊन बोलविल्याने सुरक्षिततेच्या कारणास्तव सदरची कारवाई स्थगीत करण्यात येऊन दिनांक 16/04/2025 रोजी ते रात्रगस्त करून घरी थांबतील म्हणून पुढील कारवाई दि. 17/04/2025 रोजी करण्याचे ठरविण्यात आले.

दिनांक 17/04/2025 रोजी मला लोकसेवक पीएसआय श्री दत्ता काळे यांचेकडे त्यांनी मागणी केल्याप्रमाणे 30,000/- रुपये लाच रक्कम देणेकरीता पाठविण्याचे असल्याने पोलीस निरीक्षक वाघमोरे यांनी मला लाच रक्कम हजर करणेबाबत विचारणा केली असता त्यावेळी मी 20,000/- रुपये हजर केले.तेव्हा त्यांना सदरची रक्कम माझे दिर श्री जगदीश पवार यांचेकडुन आणली असल्याचे सांगितले व त्यापेक्षा जास्त रक्कम जमा झाली नाही असेही सांगितले.पोनि वाघमोरे यांचे सुचनेनुसार म.पो.शि.8970 पुनम पवार यांनी दोन्ही पंच व मला अॅन्थ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचे उपयोग व गुणधर्म समजावुन सांगितले व मी हजर केलेल्या 500 रुपये दराच्या भारतीय चलनातील 40 नोटांचे नंबर एका कागदावर लिहले व लहान मुलांच्या खेळण्यातील 20 नोटा अशा एकत्रित



वरिष्ठ पोलीस निरीक्षक हिंजवडी पोलीस स्टेशन पिं. चिं. शहर.

Scanned with CamScanner

नोटांनाअॅन्थ्रासीन पावडर लाऊन सदर नोटा म.पो.शि.पुनम पवार यांनी माझे जवळच्या गुलाबी रंगाच्या छोटया पर्समध्ये ठेवल्या व पोलीस निरीक्षक प्रेम वाघमोरे यांनी योग्य त्या सुचना दिल्या व पी.एस.आय दत्ता काळे यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर माझ्या डोक्याला बांधलेला स्कार्प काढुन तो हातात घेवुन लाच रक्कम स्विकारलेबाबत इशारा करावा असे सांगितले.

त्यानंतर पी.एस.आय श्री दत्ता काळे यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता मला शासकिय व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन तो मपोशि पुनम पवार यांचेकरवी सेप्टी पिनच्या सहाय्याने माझे ब्लाऊजला कोणास दिसणार नाही अशा पध्दतीने लावुन देऊन शासकिय पंच क्र.1 श्रीमती दिपाली मंडलिक यांचेसह हिंजवडी पोलीस स्टेशनचे पाठीमागील बाजुचे परसिटंट कंपनी लेन, बॅकसाईट आयआयटी पार्क रोड येथुन हिंजवडी पोलीस स्टेशन येथे जाणेसाठी 13.27 वा चे सुमारास पायीरवाना केले. त्यावेळी मी पंचासह हिंजवडी पोलीस स्टेशन गेले. आमचे पाठोपाठ पो.नि.श्री वाघमोरे व सापळा पथक पोलीस स्टेशनचे आजुबाजुला विखरुन थांबले. त्यावेळी मी पोलीस ठाणे येथे गेल्यावर मला त्या ठिकाणच्या पोलीसांकडुन माहिती मिळाली की पीएसआय श्री दत्ता काळे हे त्यांची तब्येत बरी नसल्याने सुट्टीवर आहेत. त्यामुळे मी पंचासह लाच रक्कम स्विकारलेचा इशारा न करता शासकीय वाहन थांबले ठिकाणी परत आलो, ती वेळ 16/46 वा.ची होती. आमचे पाठोपाठ सापळा पथक सुध्दा सदर ठिकाणी आले. त्यावेळी म.पो.शि.पुनम पवार यांनी माझ्याकडील शायकीय व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करण्यात आला त्यावेळी मी पीएसआय श्री दत्ता काळे यांना माझ्या मोबाईल क्र. 8446184841 वरुन त्यांचे मो.क्र.8668701236यावर फोन करुन ते पोलीस ठाणे येथे कधी येणार आहेत याबाबत विचारले त्यावेळी त्यांनी फोनवर माझी तब्येत बरी नसल्याने मी सुट्टीवर आहे. एक दोन दिवसात मी पोलीस स्टेशनला येतो असे सांगितले. सदरचा फोन शासकीय व्हाईस रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड करण्यात आला. त्यामुळे सापळा कारवाई पीएसआय श्री दत्ता काळे हे सुट्टीवरुन हजर होईस्तोपर्यत स्थगित करण्याचे सर्वानुमते ठरले. दिनांक 28/04/2025 रोजी मला पीएसआय श्री दत्ता काळे हे पोलीस स्टेशन येथे हजर झाल्याची माहिती मिळाल्यामुळे मी त्याबाबत पो.नि.श्री वाघमोरे यांना कळविले त्यानुसार दिनांक 28/05/2025 रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरले त्याप्रमाणे पो.नि.श्री वाघमोरे यांनी मला पंच क्र.1 श्रीमती दिपाली मंडलिक यांचेसह पी.एस.आय श्री दत्ता काळे यांनी दिनांक 15/04/2025 रोजी मागणी केलेली लाच रक्कम 30,000/- रुपये देणेकरीता मला शासकिय व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन तो माझे ब्लाऊजचे आतील बाजुस लावुन देऊन हिंजवडी पोलीस स्टेशनचे पाठीमागील बाजुचे परसिटंट कंपनी लेन, बॅकसाईट आयआयटी पार्क रोड येथुन हिंजवडी पोलीस स्टेशन येथे पीएसआय श्री दत्ता काळे यांची भेट घेण्याकरीता 13.18 वा चे सुमारास पायीरवाना केले. आमचे पोठोपाठ पो.नि.श्री वाघमोरे व सापळा पथक पोलीस स्टेशनचे आजुबाजुला विखरुन थांबले. मी पंचासह पोलीस स्टेशन येथे गेले त्यावेळी माझी व पीएसआय श्री दत्ता काळे यांची भेट झाली त्यावेळी मी त्यांना नमस्ते सर, म्हणाले, तेव्हा त्यांनी नमस्कार या, काय म्हणताय, असे मला विचारले, तेव्हा मी त्यांना, नाय.. अजुन काय ते सुटले नाय ना, तेव्हा ते मला म्हणाले मी तर से वगैरे दिलाय की त्यांचा पाठवुन, दुस-या दिवशी से पाठवुन दिला मी त्यांचा, त्यावर मी त्यांना म्हणाले हो पण अं.... मेडिकल सर्टिफिकेट ते नाय आलंय म्हणुन अं..तेव्हा ते म्हणाले ते दिलयं की आज पाठवुन, तेव्हादिलयं का?, असे मी त्यांना विचारले, त्यावेळी ते म्हणाले हो आज दिलं पाठवुन मेडिकल सर्टिफिकेट, त्यावरतुम्हाला कॉल लावला होता तुमचा कॉल लागत नव्हता असे मी त्यांना म्हणाले तेव्हा नाय ते माझा मोबाईल जरा बिघडलाय, तुमच्या वकीलाना भेटाना, ते सांगतील, त्यांनी काय सांगितलं असे त्यांनी मला विचारले.तेव्हा त्यांना मी सांगितलं. त्यांनी तेच सांगितलं से आणलाय, मेडिकल सर्टिफिकेट आणि काय ते डायरी पोच हयाच ते तुम्ही देणार आहात म्हणुन, त्यावर ते म्हणाले से दिलाय मी त्यांना पाठवुन, तेव्हा मी त्यांना म्हणाले, मी दोन वेळेस येवुन गेले तुम्ही सुट्टीवर होते. त्यावर ते हांआ ते बायकोची तब्येत डाऊन होती त्यामुळं असे म्हणाले. त्यावर मी त्यांना म्हणाले अं... मी तीस हजार जमा केलते, त्यावेळी ते म्हणाले कशाला, ते नसंत हितं पैशे वगैरे काय नसतं ताई चालत जे काम हायका ते हितं व्हणारं, ते आजारी पडलो तेव्हापासुन जास्ती लेट झाला, आता आज मला सांगितलं, से मी लगेच पाठवुन दिला, असलं मनात सुद्धा आणु नका हिथं, असे म्हणाल्याने मी व पंच क्र.1 श्री दिपाली मंडलिक असे शासकीय वाहनाजवळ आलो आमचे पाठोपाठ पो.नि.वाघमोरे व सापळा पथक त्या ठिकाणी आले. त्यावेळी माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर म.पो.शि.कोमल शेटे यांनी काढुन बंद केला ती वेळ 14.50 वा ची होती. त्यावेळी मी पो.नि.वाघमोरे यांना माहिती दिली की, पीएसआय श्री दत्ता काळे यांनी माझ्याकडे लाच मागणी केलेल्या 30,000/- रुपये रक्कम स्विकारली नाही.

त्यामुळे लोकसेवक श्री दत्ता काळे यांना भेटण्याकरीता मला पुन्हा पंचासह 14.48 वा. पाठविण्यात आले.



Scanned with CamScanner

त्यावेळी पो.नि.वाघमोरे व सापळा पथक हे आमचे पाठोपाठ आले व पोलीस स्टेशनचे आजुबाजुला विखरुन थांबले. त्यावेळी मी पंचासह हिंजवडी पोलीस स्टेशन येथे पीएसआय श्री दत्ता काळे यांची भेट घेतली. त्यावेळी मी त्यांना विचारलेजामीन होईल का माझ्या पतीचा त्यावर ते म्हणाले, आता ते माझ्या हातात नाय, मी कसं सांगणार कोर्टाच्या हातात होईल का नाय, मी सगळे डॉक्युमेंट पाठवुन दिले ते एक लक्षात घ्या जोपर्यंत माझ्याकडं आरोपी असतो, तोपर्यंत माझ्या हाताय, माझ्या पीसीआर मध्ये दोन दिवस होता, मी माझं ते निवेदन पंचनामा,वगैरे सगळं करुन घेतलं, त्याज सॅम्पल वगैरे, पण एमसीआर झाला, एमसीआर झाला म्हणजे ते कोर्टाच्या हातामध्ये गेलं ते माझ्या हातात काहीच नसतं, जे कोर्ट मला आदेश दिलं, ते कागदपत्र मी त्यांना देतो. त्यावर मी त्यांना म्हणालेपण साहेब हयांना सोडवसान, तेव्हा ते मला म्हणाले माझ्या हातात मी काय जज ये का? त्यामुळे मी पुन्हा पंचासह शासकीय वाहन थांबलेल्या ठिकाणी आले. ती वेळ 16.33 वा.ची होती. यावेळी सुध्दा पी.एस.आय. श्री. दत्ता काळे यांनी लाच रक्कमेची मागणी केली नाही. त्यामुळे पी.एस.आय. श्री काळे यांनी मला यापुर्वी मागणी केलेली लाच रक्कम देणेबाबत विचारणा केली नाही त्यांना माझ्यावर संशय आल्याने ते पैशाबाबत पुढील बोलणी करीत नाहीत त्यावरून आता ते माझेकडुन लाच रक्कम स्विकारतील असे वाटत नाही.

तरी दि.15/04/2025 रोजी मी दिलेल्या तक्रारीवरुन दि.15/04/2025 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान हिंजवडी पोलीस स्टेशन येथील पी.एस.आय श्री दत्ता काळे यांनी माझ्या पतीला येरवडा कारागृहातुन सोडविण्यासाठी व कोर्टामध्ये से सादर करण्याकरीता तडजोडीअंती 30,000/- रुपयाची लाच मागणी केली म्हणुन त्यांचेवर कारवाई व्हावी ही विनंती.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

समक्ष

हा फिर्यादी जबाब दिला....

(प्रेम वाघमोरे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** **(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
POONAM DADASO JADHAV
**Rank (पद):** I (Inspector) **No.(क्र.):** WAPI
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**



वरिष्ठ पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन पिं. चिं. शहर

Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
Salunke उज्वला विक्रम साळूंके

पोलीस ठाणे अंमलदार
हिंजवडी पोलीस स्टेशन
पिंपरी चिंचवड शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): KANHAIYA PANNALA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

वरिष्ठ पोलीस निरीक्षक हिंजवडी पोलीस स्टेशन पिं. चिं. शहर



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 12/12/1989 | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with CamScanner